नि.दि.दा.क्र.८७/२०१७
नि.क्र.७५

<u>प्रतिवादी सा.क्र.२</u>

<u>वादी करिता उलटतपास विधीज्ञ श्री. एम.यु. तळीखेडकर यांच्या वतीने शपथेवर सुरू</u>

२. दावा मिळकतीचा क्रमांक मला माहीत नाही. प्रतिवादीची दुसरी जागा गडीच्याजवळ आहे, हे म्हणणे खरे आहे. मिळकत क्र.६०५ च्या दक्षिणेस मिळकत क्र.६५२ आहे व उत्तरेस रस्ता आहे, हे म्हणणे खरे नाही. प्रतिवादी यांनी ग्रामसेवकाशी संगनमत करुन मिळकत क्र.६५२ यालाच मिळकत क्र.६५२/१ असे बेकायदेशीररित्या केले, हे म्हणणे खरे नाही. मिळकत क्र.६५२ ही मुलत: प्रतिवादी शिवाजी यांच्या भावाची आहे, हे म्हणणे खरे नाही. प्रतिवादी शिवाजी यांनी मिळकत क्र.३६९ च्या अभिलेखासही खाडाखोड केली, हे म्हणणे खरे नाही. दावा मिळकत वादी दिलीप यांची वडीलार्जित असल्याची मला माहीत नाही. मालक या नात्याने दावा मिळकतीवर वादी दिलीप हेच कब्ज्यात आहेत, हे म्हणणे खरे नाही. दावा मिळकतीच्या पुर्वेस सरकारी रस्ता व पश्चीमेस बाजीराव शिंदे यांची मिळकत आहे, हे म्हणणे खरे नाही. दावा मिळकतीच्या दक्षिणेस मिळकत क्र.६५२ आहे, हे म्हणणे खरे आहे. दावा मिळकतीच्या उत्तरेस रस्ता आहे, हे म्हणणे खरे नाही.

३. माझया सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे, हे म्हणणे खरे नाही. प्रतिवादी शिवाजी यांचा मी सख्खा चुलत भाऊ असल्यामुळे मी त्यांना मदत करण्यासाठी खोटी साक्ष देत आहे, हे म्हणणे खरे नाही.

<u>उलटतपास पूर्ण</u>.

<u>फेरतपास नाही</u>.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by PANDE RAVI VIJAYPRASAD
Date: 2026.07.20 14:07:53 +0530

(रवि वि.पांडे)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर
निलंगा,जि.लातूर

दिनांक २०/०७/२०२६.